MAHARASHTRA TIMES, Mumbai, 19.5.2023
Page No. 2, Size:(18.80)cms X (11.47)cms.

**Along with Bullet train, roads will also be faster: Virar Bullet station will be connected by Highways, State roads**



## विरार बुलेट स्थानकाला महामार्ग, राज्य मार्गांची जोड

# बुलेट ट्रेनसोबतच रस्तेप्रवासही वेगवान




### मार्ग – विरार बुलेट स्थानकापासून अंतर

| | |
|---|---|
| विरार रेल्वे स्थानक | ८ किमी |
| पेल्हार रोड | १ किमी |
| विरार-नालासोपारा रोड | ४.५ किमी |
| चंदनसार रोड | ९.५ किमी |
| राष्ट्रीय महामार्ग | ६ किमी |

### बुलेट रेल्वे स्थानक परिसर

- बुलेट स्थानकाच्या दोन्ही दिशेला राखीव पादचारी क्षेत्र
- बससाठी स्वतंत्र प्रवेशद्वार
- रिक्षा, तीनचाकी, दुचाकी वाहनांसाठी स्वतंत्र प्रवेशद्वार
- चारचाकी वाहनांसाठी स्वतंत्र प्रवेशद्वार
- रिक्षा, बस आणि दुचाकीसाठी स्वतंत्र वाहनतळ
- व्यावसायिक विकासासाठी राखीव क्षेत्र

महेश चेमटे
mahesh.chemte@timesgroup.com

**मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी रुळ उभारणीच्या पायाभूत सुविधांची कामे वेगाने होत असताना राज्यातील स्थानकांनी आकार घेण्यास सुरुवात केली आहे. मुंबई महानगरातील शेवटचे बुलेट रेल्वे स्थानक विरारमध्ये असणार आहे. विरार बुलेट ट्रेन स्थानक जमिनीपासून २०.७९० मीटर उंचीवर असेल. येथे बुलेट ट्रेनला राष्ट्रीय महामार्गासह रेल्वे मार्ग आणि तीन राज्य मार्गांची जोडणी देण्यात आलेली आहे.**

### वलई पाडा रस्त्याचा विस्तार

विरार-नालासोपारा यांना जोडणाऱ्या वलई पाडा रस्त्याचा सात मीटर रुंदीपर्यंत विस्तार करण्यात येणार आहे. यामुळे विरार-नालासोपारासह मुंबई-अहमदाबाद मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या हा रस्ता सुमारे साडेतीन मीटर रुंद आहे.

### रस्ते प्रवासही वेगवान

जुना मुंबई-दिल्ली आणि मुंबई-चेन्नई महामार्ग जोडून राष्ट्रीय महामार्ग ४८ तयार करण्यात आला. मुंबई, पुणे, बेगळुरू, जयपूर, अहमदाबाद, सुरत या शहरांमधून हा महामार्ग जातो. विरार बुलेट स्थानकापासून अवघ्या ६ किमी अंतरावर हा राष्ट्रीय महामार्ग आहे. याचबरोबर पेल्हार रोड, चंदनसार रोड, विरार-नालासोपारा रोड यांची जोड असल्याने बुलेट ट्रेनने उतरल्यावर वेगाने रस्ते प्रवास करणे शक्य आहे

### तळमजल्यावरील प्रवासी सुविधा

- तिकीट विक्री केंद्र
- प्रतीक्षा क्षेत्र
- आरामकक्ष
- सुरक्षा तपासणी
- वैद्यकीय कक्ष
- अत्याधुनिक सुविधागृह (बिझनेस लाऊंज)
- नर्सरी
- किरकोळ विक्री केंद्र



### पहिला मजला

- चार फलाट, दुतर्फा फलाट
- अप-डाऊन प्रत्येकी दोन मार्गिका
- तळमजल्यावरून पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी लिफ्ट, सरकते जिने आणि पायऱ्या उपलब्ध असणार आहेत.

**स्रोत : नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एनएचएसआरसीएल)**

NHSRCL
National High Speed Rail Corporation Ltd.
DAINIK BHASKAR, Mumbai, 18.5.2023
Page No. 1, Size:(7.73)cms X (11.09)cms.

**भास्कर स्पेशल :** एनएचएसआरसीएल, मनपा और एमएमआरडीए बदलेंगे सूरत

# जापान की तर्ज पर बुलेट ट्रेन स्टेशनों का विकास

## ▪ स्टेशन से 500 मीटर से लेकर एक किमी दायरे का खाका तैयार




सुजीत गुप्ता | मुंबई

अहमदाबाद-मुंबई के बीच हाई स्पीड बुलेट रेल कॉरिडोर (508 किमी) का काम तेजी से किया जा रहा है। बुलेट ट्रेन के मार्ग पर महाराष्ट्र में ठाणे और विरार दो स्टेशन बनेंगे। इन स्टेशनों का विकास जापानी ट्रांजिट ओरिएंटेड डेवेलपमेंट मॉडल के तहत होगा। मल्टी मॉडल इंटीग्रेशन प्लानिंग से इन इलाकों के आसपास की तस्वीरें आने वाले दिनों में बदल जाएगी। बुलेट ट्रेन स्टेशन के आसपास विकास की संभावनाएं अधिक है। इसलिए नेशनल हाई स्पीड रेल कारपोरेशन (एनएचएसआरसीएल) ने इसका खाका तैयार कर लिया है। दोनों स्टेशनों के विकास में एमएमआरडीए के अलावा ठाणे और वसई-विरार महानगर पालिका (मनपा) भी अहम भूमिका निभाएंगी। योजना के तहत स्टेशन से एक किमी के दायरे में जरूरी सुविधाएं विकसित की जाएंगी। यानी स्टेशन से लगा एक किमी क्षेत्र पूरी तरह से हाई टेक होगा। इसका उद्देश्य यात्री सुविधाओं का विकास और स्टेशन के आसपास आर्थिक गतिविधियों को बढ़ावा देना है।

### ऐसे बदलेंगे स्टेशन

- भीड़भाड़ में कमी और स्टेशन तक आसानी से पहुंच
- स्टेशन के आसपास विभिन्न व्यावसायिक गतिविधियों को बढ़ावा देने से यात्रियों को सुविधा होगी। साथ ही शहर की अर्थव्यवस्था को भी बढ़ावा मिलेगा।
- कॉर्पोरेट कार्यालयों, होटलों, शैक्षणिक और चिकित्सा सुविधा जैसे प्रतिष्ठानों का विकास
- प्रीमियम एफएसआई, एफएआर के माध्यम से भूमि मूल्य अधिग्रहण करने से अतिरिक्त राजस्व मिलेगा और स्टेशन क्षेत्र के विकास के वित्त पोषण में मदद मिलेगी

▸ जापान के सलाहकारों के अध्ययन के आधार पर विरार, ठाणे, सूरत और साबरमती हाई स्पीड रेल स्टेशन चुने गए हैं। इन स्टेशनों के आसपास विकास की अधिक संभावनाएं हैं। जापानी सलाहकारों की मदद से इन स्टेशनों के आसपास के परिसरों का विकास राज्य सरकार के नियामानुसार किया जाएगा।

**- सुषमा गौर,** प्रवक्ता-एनएचएसआरसीएल

▸ बीकेसी में बुलेट ट्रेन स्टेशन पर हमें गर्व है। हाई स्पीड रेल स्टेशन के आसपास का विकास लास्ट माइल कनेक्टिविटी पर केंद्रित होगा। इससे निवासी और ऑफिस वाले इलाकों में रहने वाले लोगों को सड़क यातायात पर अधिक निर्भर नहीं रहना पड़ेगा। इस परियोजना को सफल बनाने में प्राधिकरण हर संभव मदद करेगा।

**- एस वी आर श्रीनिवास,** एमएमआर आयुक्त, एमएमआरडीए

NAVBHARAT TIMES, Mumbai, 17.5.2023
Page No. 3, Size:(4.19)cms X (8.39)cms.

# बुलेट ट्रेन स्टेशन को लेकर हुई बैठक

रिपोर्टर, मुंबईः बीकेसी में बन रहे बुलेट ट्रेन स्टेशन परिसर को विकसित करने के लिए एमएमआरडीए मुख्यालय में बैठक आयोजित हुई। इस मौके पर एमएमआरडीए कमिश्नर एस.वी. आर. श्रीनिवास ने कहा कि स्टेशन परिसर विकसित करने से रेसिडेंशल इलाकों से आवाजाही आसान होगी। गौरतलब है कि ठाणे, विरार, सूरत और साबरमती स्टेशन के आस-पास जापान की तर्ज पर स्टेशन एरिया डिवेलप करने का फैसला किया गया है। मुंबई से अहमदाबाद के बीच 508 किमी की दूरी तक चलने वाली बुलेट ट्रेन प्रॉजेक्ट की लागत 1.08 लाख करोड़ रुपये है। इस पर 12 स्टेशन बनेंगे।

PUDHARI, Mumbai, 17.5.2023
Page No. 3, Size:(10.44)cms X (5.28)cms.

**Bullet train Station area will be developed.**

# बुलेट ट्रेन स्थानक परिसराचा होणार विकास

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे अर्थात बुलेट ट्रेनच्या मार्गातील निवडक स्थानकांच्या परिसराचा विकास केला जाणार आहे. या संदर्भातील पहिली बैठक एमएमआरडीए मुख्यालयात पार पडली.

या बैठकीस हायस्पीड रेल्वे, गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालय, एमएमआरडीए, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ठाणे महापालिका, वसई विरार महानगर पालिका, जपान दूतावास आणि जायका वित्तसंस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत दिल्ली, अहमदाबाद आणि मुंबई येथे आयोजित केल्या जाणाऱ्या 'स्मार्ट' प्रकल्पाबाबत चर्चा झाली.

**• गुजरातमधील साबरमती, सुरत आणि महाराष्ट्रातील विरार आणि ठाणे या चार हायस्पीड रेल्वे स्थानकांचा करारात समावेश आहे. या प्रकल्पामुळे मुंबई शहर, ठाणे, वसई, विरार, बोईसर, तारापूर, पालघर आणि उत्तर महाराष्ट्रातील इतर ठिकाणचे प्रवासी आणि उद्योगांना फायदा होईल.**

बुलेट ट्रेन स्थानकांच्या आसपासच्या परिसराचा विकास हा स्थानक ते कार्यालय किंवा निवासी विभाग अर्थात लास्ट माईल कनेक्टिव्हिटीवर लक्ष केंद्रित करून केल्याने निवासी आणि कार्यालयीन भागांमधील वाहतूक सुलभ होऊन रस्ते वाहतुकीवरील अवलंबित्व कमी होईल, असा विश्वास एमएमआरडीए आयुक्त एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालय आणि रेल्वे मंत्रालयाने संयुक्तपणे जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी सोबत मुंबई-अहमदाबाद हाय स्पीड रेल स्थानकाच्या परिसराच्या क्षेत्र विकासासाठी सामंजस्य करार करण्यात आला .

MAHARASHTRA TIMES, Mumbai, 17.5.2023
Page No. 3, Size:(7.46)cms X (13.71)cms.

NHSRCL
National High Speed Rail Corporation Ltd.

**Bullet train Stations will be 'Smart' , Meet organised at MMRDA, work to begin with BKC Station.**

# बुलेट ट्रेनची स्थानके होणार 'स्मार्ट'

## एमएमआरडीएमध्ये बैठक; सुरुवात बीकेसीपासून

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वेतील (बुलेट ट्रेन) स्थानके 'स्मार्ट' होणार आहेत. याअंतर्गत स्थानकांच्या आजूबाजूच्या क्षेत्राचा विकास साधला जाणार आहे. त्याबाबत मंगळवारी महत्त्वाची बैठक मुंबई महागर क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) कार्यालयात पार पडली.

नॅशनल हायस्पीड रेल्वे कंपनी लिमिटेड (एनएचएसआरसीएल) ही विशेष उपक्रम कंपनी जपानी गुंतवणूक एजन्सीच्या (जायका) सहकार्याने १.०८ लाख कोटी रुपये खर्चून बुलेट ट्रेनसाठी मार्गिकेची उभारणी करीत आहेत. या ५०८ किमी मार्गिकेवर १२ स्थानके आहेत. त्यापैकी बीकेसी, ठाणे, विरार आणि बोईसर ही चार स्थानके महाराष्ट्रात आहेत. त्यांची लांबी १५६ किमी इतकी आहे. या स्थानक परिसरांचा विकास राज्य सरकार व महापालिकांच्या सहकार्याने होणार आहे. त्यामध्ये एमएमआरडीएची भूमिका मोलाची असेल. यासाठीच स्थानक परिसर व क्षेत्र विकासासंबंधीच्या बैठकीला एमएमआरडीए कार्यालयातून सुरुवात झाली आहे.

एमएमआरडीएने दिलेल्या माहितीनुसार, या स्थानकांच्या क्षेत्राचा विकास केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालयाच्या 'स्मार्ट' (SMART) या उपक्रमांतर्गत होणार आहे. त्यासंबंधीच्या बैठकीत शहरी कार्य मंत्रालय, नगर व देश नियोजन संघटना (टीसीपीओ), मुंबई रेलविकास महामंडळ, एनएचएसआरसीएल, राज्य सरकार, एमएमारडीए, ठाणे महापालिका, वसई विरार महानगरपालिका, जपान दूतावास, जायका मुख्यालय, जायका भारत कार्यालय येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

साबरमती, सूरत, विरार आणि ठाणे या स्थानकांच्या परिसरातील विकासासाठी आदर्श नियोजन हे जपानमधील स्थानकांसाठी अवलंबलेल्या अनुभव आणि पद्धतींबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. राज्यातील चार स्थानक परिसरांचा विकास साधून प्रकल्पाचा संपूर्ण आर्थिक लाभ मिळावा आणि स्थानकाला अभिसरण केंद्र म्हणून विकसित करावे, यासंबंधी चर्चा करण्यात आली. या स्थानक विकासाची सुरुवात बीकेसी या पहिल्या स्थानकापासून होणार असल्यानेच एमएमआरडीएची भूमिका यांत महत्त्वाची असेल.

PRAHAAR, Mumbai, 17.5.2023
Page No. 3, Size:(4.79)cms X (4.02)cms.

**Bullet train Station area development meet was conducted.**

# बुलेट ट्रेन स्थानक क्षेत्र विकास संबंधित बैठक संपन्न

मुंबई (प्रतिनिधी) : मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या स्थानक क्षेत्र विकास संबंधित सुरुवातीची बैठक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयात मंगळवारी संपन्न झाली. या बैठकांचे आयोजन केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, गुजरात सरकार आणि जायका यांनी संयुक्तपणे केले होते. बैठकीला केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, जयका आणि एमएमआरडीएच्या वरिष्ठ अधिकारी होते उपस्थित होते.

गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालय आणि रेल्वे मंत्रालयाने संयुक्तपणे जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी सोबत 'मुंबई-अहमदाबाद हाय स्पीड रेल स्थानकाच्या परिसराचा क्षेत्र विकास' (प्रोजेक्ट-स्मार्ट) साठी सामंजस्य करार केला आहे.

गुजरातमधील साबरमती, सूरत आणि महाराष्ट्रातील विरार आणि ठाणे या चार हायस्पीड रेल्वे स्टेशनसाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

LOKSATTA, Mumbai, 17.5.2023
Page No. 3, Size:(13.57)cms X (5.21)cms.

## BKC Bullet Train Station area to soon undergo development

# बीकेसीसह बुलेट ट्रेन स्थानक परिसरांचा लवकरच विकास

### स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत परिसर विकासासाठीची पहिली बैठक संपन्न

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील स्थानकाच्या परिसराचा सर्वांगीण विकास करण्यात येणार आहे. स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत हा विकास करण्यात येणार असून वांद्रे-कुर्ला संकुल बुलेट ट्रेन परिसर विकासासाठी मंगळवारी पहिली बैठक पार पडली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीत विविध विभगाचे उपस्थित होते.

देशातील पहिली बुलेट ट्रेन मुंबई ते अहमदाबाददरम्यान धावणार आहे. या प्रकल्पाचे काम राज्यात आणि देशात वेगात सुरू आहे. दरम्यान या प्रकल्पाचे शेवटचे स्थानक आणि टर्मिनस बीकेसी येथे असणार आहे. त्यामुळे येत्या काळात बीकेसीचे महत्त्व आणखी वाढणार आहे. अशात बुलेट ट्रेन मार्गिकितील सर्व स्थानक परिसराचा विकास करण्यात येणार आहे. गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालय आणि रेल्वे मंत्रालयाने संयुक्तपणे जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी (जायका) सोबत सामंजस्य करार केला. गुजरातमधील साबरमती, सुरत आणि महाराष्ट्रातील विरार आणि ठाणे या चार स्थानकासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्पासाठी एनएचएसआरसीएलद्वारे अंदाजे रु. १.०८ लाख कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सुमारे ५०८ किमी अंतराच्या बुलेट ट्रेन प्रकल्पात १२ स्थनाके असून त्याचा प्रस्तावित वेग सुमारे ३२० ते ३५० किमी प्रतितास असेल. या प्रकल्पामुळे मुंबई शहर, ठाणे, वसई, विरार, बोईसर, तारापूर, पालघर आणि उत्तर महाराष्ट्रातील इतर ठिकाणच्या प्रवाशांना आणि उद्योगांना फायदा होईल. प्रकल्पाच्या संरेखनातील १२ स्थानकांपैकी, बीकेसी, ठाणे, विरार आणि बोईसर ही ४ स्थानके महाराष्ट्रात आहेत ज्यांची लांबी १५६ किमी इतकी आहे.

बीकेसीसह राज्यातील चार स्थानकांचा विकास कसा करायचा यावर यावेळी चर्चा झाली. तर बीकेसीत बुलेट ट्रेनचे टर्मिनस आणि स्थानक होणार असून ही अभिमानाची बाब असल्याचे यावेळी महानगर आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवास यांनी सांगितले. तर बीकेसी बुलेट ट्रेन स्थानकाचा विकास करताना इतर वाहतूक व्यवस्थेशी या स्थानकाला जोडण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

**When high speed railway will run , the traffic on the roads will be less**

# हायस्पीड रेल धावणार; रस्त्यावरील ताण कमी होणार !

## प्रकल्पाच्या विकासासंदर्भात झाली बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भारतातील पहिल्या बुलेट ट्रेनचे पहिले स्थानक वांद्रे-कुर्ला संकुलात आहे; याचा अभिमान असून, हायस्पीड रेलस्थानकांच्या आसपासच्या परिसराचा विकास हा लास्ट माइल कनेक्टिव्हिटीवर लक्ष केंद्रित करून केल्याने निवासी आणि कार्यालयीन भागांमधील वाहतूक सुलभ होऊन रस्ते वाहतुकीवरील अवलंबित्व कमी होईल, असा दावा एमएमआरडीएचे महानगर आयुक्त एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी केला.



हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या स्थानक क्षेत्र विकासाबाबत झालेल्या बैठकीत जपानी शिष्टमंडळासमवेत चर्चा करताना एस.व्ही.आर.श्रीनिवास.

मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या स्थानक क्षेत्र विकासासंबंधित सुरुवातीची बैठक वांद्रे-कुर्ला संकुल येथील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयात मंगळवारी झाली; यावेळी एस. व्ही. आर. श्रीनिवास बोलत होते. गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालय, राज्य सरकार, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ठाणे महानगरपालिका, वसई विरार महानगरपालिका, जपानचे दूतावास, तज्ज्ञ यावेळी उपस्थित होते. दिल्ली, अहमदाबाद आणि मुंबई येथे आयोजित केल्या जाणाऱ्या स्मार्ट प्रकल्पांतर्गत स्थळ पाहणी आणि परिसंवादाचा एक भाग म्हणून ही बैठक होती. बैठकांचे आयोजन केंद्र सरकार, राज्य सरकार, गुजरात सरकार आणि जायका यांनी संयुक्तपणे केले होते.

गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालय आणि रेल्वे मंत्रालयाने संयुक्तपणे जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी सोबत मुंबई-अहमदाबाद हाय स्पीड रेल स्थानकाच्या परिसराचा क्षेत्र विकासासाठी सामंजस्य करार केला. गुजरातमधील साबरमती, सुरत आणि महाराष्ट्रातील विरार आणि ठाणे या चार हायस्पीड रेल्वे स्टेशनसाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

### १२ स्थानके प्रकल्पात

- मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्पासाठी १.०८ लाख कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.
- सुमारे ५०८ किमी अंतराच्या बुलेट ट्रेन प्रकल्पात १२ स्थानके असून, त्याचा प्रस्तावित वेग सुमारे ३२० ते ३५० किमी प्रतितास असेल.
- या प्रकल्पामुळे मुंबई शहर, ठाणे, वसई, विरार, बोईसर, तारापूर, पालघर आणि उत्तर महाराष्ट्राला फायदा होईल.
- मुंबई अहमदाबाद हायस्पीड रेल्वेच्या संरेखनातील १२ स्थानकांपैकी बीकेसी, ठाणे, विरार आणि बोईसर ही चार स्थानके महाराष्ट्रात आहेत ज्यांची लांबी १५६ किमी इतकी आहे.



NAV-BHARAT, Mumbai, 18.5.2023
Page No. 4, Size:(13.28)cms X (6.27)cms.

# विकास की धुरी बनेंगे बुलेट ट्रेन के स्टेशन

## ठाणे, विरार हाई स्पीड रेल की स्मार्ट परियोजना ने पकड़ी रफ्तार, तेजी से हो रहे काम

■ मुंबई, नवभारत न्यूज नेटवर्क. पीएम मोदी का ड्रीम प्रोजेक्ट कही जाने वाली बुलेट ट्रेन परियोजना अब महाराष्ट्र में रफ्तार पकड़ रही है. बीकेसी में बुलेट ट्रेन का अंडरग्राउंड टर्मिनल स्टेशन बनाने की शुरुआत के साथ ठाणे और विरार में बनने वाले हाई स्पीड ट्रेन के रेलवे स्टेशनों को स्मार्ट प्रोजेक्ट के रूप में विकसित किए जाने की योजना है. महाराष्ट्र और गुजरात में बुलेट ट्रेन स्टेशनों के साथ उनके आसपास क्षेत्र का भी इकोनोमी जोन के रूप में विकास किया जाएगा. इसके लिए महाराष्ट्र में ठाणे और विरार एवं गुजरात में साबरमती और सूरत इन स्टेशनों का चयन किया गया है. ठाणे और विरार एचएसआर स्टेशन क्षेत्रों में ट्रांजिट ओरिएंटेड विकास के लिए योजना और मॉडल बुक तैयार किया गया है.



### जापान इंटरनेशनल से समझौता

बुलेट ट्रेन के ठाणे सहित 4 स्टेशनों और परिसर को परियोजना-स्मार्ट के तहत विकसित करने के लिए केंद्रीय शहरी एवं आवास मंत्रालय ने महाराष्ट्र और गुजरात सरकार के साथ मिलकर जापान इंटरनेशनल कॉर्पोरेशन एजेंसी के साथ समझौता किया है. इस मामले में साईट विजिट एवं अन्य तैयारियों के पहले मंगलवार को एमएमआरडीए में एक उच्चस्तरीय बैठक आयोजित की गई. बैठक में जेआईसीए और एनएचएसआरसीएल के साथ आवास और शहरी मामलों के मंत्रालय, एमएमआरडीए, एमआरवीसी, महाराष्ट्र सरकार,ठाणे मनपा, वसई मनपा, जापान दूतावास से संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित थे.

### आर्थिक एवं सामाजिक संसाधनों का विकास

एमएमआरडीए आयुक्त एसवीआर श्रीनिवास ने इस बैठक की जानकारी देते हुए कहा कि भारत की पहली बुलेट ट्रेन का पहला स्टेशन बीकेसी में बन रहा है. इसके साथ हाई स्पीड रेल के ठाणे सहित अन्य स्टेशन से लास्ट माइल कनेक्टिविटी को बढ़ावा देने के साथ आसपास परिसर को आर्थिक एवं सामाजिक संसाधनो से सक्षम बनाया जाएगा. इसमें केंद्र व राज्य सरकार के साथ एमएमआरडीए की भुमिका होगी. गुजरात में साबरमती, सूरत और महाराष्ट्र में विरार और ठाणे इन 4 हाई स्पीड रेलवे स्टेशनों के लिए समझौता ज्ञापन पर हस्ताक्षर किए गए हैं.इस परियोजना से मुंबई के अलावा ठाणे, वसई, विरार, बोईसर, तारापुर, पालघर और उत्तर महाराष्ट्र के अन्य स्थानों के नागरिकों और उद्योगों को लाभ होगा.

### क्या है 'प्रोजेक्ट स्मार्ट'?

प्रोजेक्ट स्मार्ट योजना के तहत चयनित 4 स्टेशनों के आसपास के क्षेत्र का विकास और प्रबंधन कर आर्थिक गतिविधियों को बढ़ावा दिया जाएगा. इसके लिए आवास और शहरी मामलों के मंत्रालय और जापान इंटरनेशनल कॉर्पोरेशन फंड एवं अन्य तकनीक उपलब्ध कराएगा. उल्लेखनीय है कि अहमदाबाद मुंबई बुलेट ट्रेन परियोजना पर 1.08 लाख करोड़ खर्च होने का अनुमान है. 508 किमी की दूरी वाली बुलेट ट्रेन परियोजना में 12 स्टेशन हैं और इसकी प्रस्तावित गति लगभग 320 से 350 किमी प्रति घंटा होगी. गुजरात में काम तेजी से चल रहा है. महाराष्ट्र में भी शुरुआत हो चुकी है. 12 स्टेशनों में से 4 स्टेशन महाराष्ट्र में बीकेसी, ठाणे,



विरार और बोईसर में स्थित हैं, जिनकी दूरी 156 किमी है.

DIVYA BHASKAR, Ahmedabad, 18.5.2023
Page No. 10, Size:(7.37)cms X (8.32)cms.

**Mumbai High Speed Bullet Train Stations Are Also Smart**

# મુંબઈ-અમદાવાદ હાઈસ્પીડ બુલેટ ટ્રેનના સ્ટેશન પણ સ્માર્ટ

## સ્ટેશનના આસપાસના પરિસરનો વિકાસ સાધવામાં આવશે

**ભાસ્કર ન્યૂઝ | મુંબઈ**

મુંબઈ-અમદાવાદ હાઈસ્પીડ રેલવે એટલે કે બુલેટ ટ્રેન રૂટના સ્ટેશન પણ સ્માર્ટ બનશે. એના અંતર્ગત સ્ટેશનની આસપાસના પરિસરનો વિકાસ સાધવામાં આવશે. આ બાબતે મુંબઈ મહાનગર ક્ષેત્રવિકાસ પ્રાધિકરણના કાર્યાલયમાં બેઠક યોજવામાં આવી હતી.

વિશેષ ઉપક્રમ કંપની એટલે કે નેશનલ હાઈસ્પીડ રેલવે કંપની લિમિટેડ જાપાનની ઈન્વેસ્ટમેંટ એજન્સી જાયકાના સહકાર્યથી 1.08 લાખ કરો રૂપિયા ખર્ચીને બુલેટ ટ્રેન રૂટ તૈયાર કરી રહી છે. આ 508 કિલોમીટરના રૂટ પર 12 સ્ટેશન છે. એમાંથી બીકેસી, થાણે, વિરાર અને બોઈસર એમ ચાર સ્ટેશન મહારાષ્ટ્રમાં છે. એની લંબાઈ 156 કિલોમીટર છે. આ સ્ટેશનના પરિસરનો વિકાસ રાજ્ય સરકાર અને મહાપાલિકા સાથે મળીને કરશે. એમાં એમએમઆરડીએની ભૂમિકા મહત્વની રહેશે. એના માટે સ્ટેશન પરિસર અને ક્ષેત્ર વિકાસ સંબંધી બેઠકની એમએમઆરડીએના કાર્યાલયથી શરૂઆત કરવામાં આવી હતી.